**जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,**
**ठाणे शहर**
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
**मो.क्र.9819208279**

**प्रेसनोट** **दिनांक २२.०१.२०२५**

## ‘‘ मोक्का आणि जबरी चोरीच्या १८ गुन्हयांमधील पाहिजे असलेल्या सराईत गुन्हेगारास शिताफीने अटक ’’

शांतीनगर पोलीस ठाणे गु.र.नं. I १२/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) या गुन्हयाचा गुन्हे शाखा, घटक-२, भिवंडीचे सहा.पोलीस निरीक्षक/धनराज केदार हे तपास करीत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, एक रेकॉर्ड वरील गुन्हेगार याने शांतीनगर पोलीस ठाणे हद्दीतुन एफ.झेड. मोटर सायकल चोरी केलेली आहे व तो निळया रंगाची स्कुटर घेवुन बैलका मैदान, चव्हाण कॉलनीच्या मागे, भिवंडी येथे ताडी पिण्यासाठी आलेला आहे. सदर बातमीच्या अनुषंगाने सपोनि/धनराज केदार व त्यांच्या पथकाने छापा टाकुन तेथील इसम नामे ऑन अली सरर्फराज जाफरी उर्फ शेट्टी, वय-२४ वर्षे, रा.पिराणीपाडा, भिवंडी यास चोरीची ॲक्सीस स्कुटरसह ताब्यात घेतले व कसोशीने तपास केला असता तो सराईत गुन्हेगार असल्याचे समजले तसेच त्याने ०४ चैन स्नॅचिंग व ०३ मोटर सायकल चोरीच्या गुन्हयांची कबुली दिली आहे.

सदर आरोपी कडुन एकुण २,६५,०००/- रूपये किमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर आरोपी हा नारपोली पो.ठाणे गुन्हा रजि.नं. I १०९७/२०२३ भा.द.वि.क. ३९२,३४ सह महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी प्रतिबंध अधिनियम १९९९ चे कलम ३(१)(ii),३ (२),३ (४) सह इतर १८ चैन स्नॅचिंगच्या गुन्हयात पाहिजे असलेला आरोपी आहे. तसेच त्याच्यावर यापुर्वी वेगवेगळया पोलीस ठाण्यात मोटर सायकल चोरी व चैन स्नॅचिंगचे एकुण १४ गुन्हे दाखल आहेत.

वरील कामगिरी ही श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे व श्री.शेखर बागडे, सहायक पोलीस आयुक्त, शोध-१, गुन्हे शाखा, ठाणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक-२ भिवंडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे, सपोनि/धनराज केदार, सहा.पो.उप निरी./चौधरी, पोहवा/४५४६ प्रकाश पाटील, पोहवा/५५३४ किशोर थोरात, पोशि/१९९७ अमोल इंगळे, पोशि/७६८९ भावेश घरत, पोशि/७७०० विजय कुंभार, पोशि/४३४ नितीन बैसाने यांनी केलेली आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर